पोथीमध्ये लपली

लेखन: डब्ल्यू. निकोल लीसा

चित्र: बॉनी क्रिस्टनसन

मराठी: अश्विनी बर्वे





सायमन अनाथ होता. शेतकरी कुटुंबातला मुलगा. पण डोक्याने एकदम तल्लख होता. त्याने लवकरच ‘स्क्रिप्टोरियम’ म्हणजे सचित्र पोथ्यांचे लेखनातले बारकावे शिकून घेतले.

शिकण्याचा त्याचा वेग एवढा होता की त्याला वाटले कि गुरूंच्या पोथीला तो स्वतः सजावट करू शकतो. चित्र काढू शकतो.

पण मठाधीश, फादर त्याला म्हणतात की, त्याला उंदरावर ताबा मिळवायला शिकायला लागेल.

लेखिका डब्ल्यू. निकोल लीस आणि चित्रकार बॉनी क्रिस्टनसनने एक अमोल ‘इल्युमिनेटेड’ (सचित्र) पुस्तक लिहले आहे. ज्यात धैर्य, प्रतिभा आणि कल्पनाशीलता त्यात आहे.

पोथीमध्ये लपली जादू



लेखन: डब्ल्यू. निकोल लीसा

चित्र: बॉनी क्रिस्टनसन

मराठी: अश्विनी बर्वे

आमुख

जसे अनेक वेळा होते, तसे या पुस्तकाची प्रेरणा दुसरे पुस्तक आहे. एलिज़ाबैथ बी. विल्सनचे लेखन *बायबल्स् एण्ड बैस्टिएरीस्: ए गाइड टू इल्युमिनेटेड मैन्युस्क्रिप्टस्* (१९९४) न्यूयॉर्कची पियरपॉन्ट मॉर्गन लायब्रीच्या सहभागाने तयार झाले होते. मिज़ विल्सनने यात एक चित्र सामील केले ते सेंट ऑगस्टाइनची *सिटी ऑफ गॉडमधून घेतले गेले, जे ११४० इसवीसनातले आहे.*

हे चित्र नक्कल करणाऱ्या (लेखनकरणारा) हिल्डेबर्टस्चे आहे. त्याला एक त्रास देणारा उंदीर दिसतो. उंदीर त्याचा पनीरचा तुकडा चोरतो. हिल्डेबर्टस्च्या चित्राच्या खाली त्याच्या युवा शिष्याचे एक चित्र आहे, ज्याला आपल्या गुरूला होणाऱ्या त्रासापासून पूर्णपणे अज्ञानी असून तो चर्मपत्रावर केल्या जाणाऱ्या सजावटीचे नमुन्यांची नक्कल करत आहे.

खरेतर चित्रात हिल्डेबर्टस् आणि उंदिर आहे. मला त्या युवा शिष्याच्या बाबत विचार केल्याशिवाय राहू शकत नाही. तो मठाच्या स्क्रिप्टोरियम (लेखन-कक्षात) कसा आला? त्याला कसे शिक्षित किंवा प्रशिक्षित कसे केले गेले? तो सुद्धा एक कुशल चित्रकार झाला का?

सगळ्या गोष्टींसारखीच ही गोष्ट सुधा त्या प्रश्नाने माझ्या मनात निर्माण झाली जे माझ्या मनात किलबिल करत होते.






मध्ययुगामध्ये एखाद्या सामंताच्या मुलाला लेखन वाचन शिकवण्यासाठी चर्चमध्ये दाखल केले जाई, ही गोष्ट सामान्य होती. काही श्रीमंत लोकांचे सुद्धा चर्चच त्यांचे घर असे.

पण सायमनची गोष्ट वेगळी होती. तो कोणा सामंतचा मुलगा नव्हता. तो अनाथ आणि एका गरीब शेतकरी कुटुंबातला होता. त्याचे आईवडील वसंतात आलेल्या पुरात वाहून गेले होते.

पन सायमनला गोष्टी पटकन समजत असत आणि तो चतुर सुद्धा होता. यामुळे मठातले सन्यासी त्याला आपल्या मठातून काढून टाकू श्कले नाही, जिथे तो एक दिवस हजर झाला होता.



सायमनला शिकवण्याचे, समजवण्याचे काम ब्रदर विलियमवर येऊन पडले होते. ते मठाचे एक संन्यासी होते आणि एक तज्ञ पत्र लेखक होते. ते लेखन-कक्षात काम करत असत. ब्रदर विलियमच्या देखरेखीखाली सायमन लेखनकक्षातले व्यवहार शिकू लागला. मेंढीची कातडी कशी वाळवायची आणि ताणून त्याचे चर्मपत्र कसे केले जाते,रंग तयार करण्यासाठी ते कसे कुटायचे आणि वर्णमालेतरली अक्षरे हुबेहूब कसे गिरवायचे.

ब्रदर विलियमच्या खाली सायमनने वेगवेगळ्या प्रकारचे हस्तलिखित/पोथ्याच्या बाबत शिकून घेतले. ज्या मठातल्या लेखनकक्षात ठेवल्या होत्या, तिथे हाताने लिहलेली पुस्तके होती.

इथे बैस्टियरी असली या काल्पनिक जानवरों की क़िताबें होती हैं।





त्याला हे ही समजले की हर्बल पोथीमध्ये औषधी वनस्पतीची नोंद आहे. आणि भजनमालेत बायबलची गाणी होती.

सायमन जिज्ञासु शिष्य होता. त्याला वाटे त्याने मठाधीश फादर एनसैल्मला, जे चित्रकलेत उस्ताद होते, त्यांना मदत करावी. त्याला मठातील एखाद्या पोथीसाठी चित्र काढावे वाटत होते.



पण ब्रदर विलियम यांना वाटे की सायमनने आधी खूप अभ्यास करावा. शेकडो तास त्याने चर्मपत्राच्या तुक्द्यान्वे चित्रांची नक्कल करावी. पानाचे नक्षीदार नमुने करावे. घोटीव वेलबुट्टी काढावी.

एक दिवस आपला अभ्यास पूर्ण केल्यावर सायमनने ब्रदर विलियमला विचारले, “मी फादर एनसैल्मच्या पोथीसाठी चित्र काढू शकतो का?”


‘‘धीर धर सायमन,’’ ब्रदर विलियम म्हणाले. “माहीत आहे चर्मपत्राच्या कटाई शिवाय इतर वस्तूंना हात लावण्याची परवानगी मला खूप वर्षानंतर मिळाली होती. आणि तू तर इतर कोणा शिष्यापेक्षा लवकर प्रगती केली आहे.”

‘‘पण मी चिंध्यावर पानाचे नमुने काढण्यापेक्षा अधिक काहीतरी करण्यास तयार आहे..”

‘‘बेशक, तू पात्रता खूप आहे सायमन,” ब्रदर विलियमने त्याला टोकत म्हटले. “मला अजिबात शंका वाटत नाही एक दिवस तुझी चित्र अनेक पोथ्यामध्ये असतील याची. पण हा निर्णय तर फक्त फादर एनसैल्मच करू शकतात.

सायमनने मान खाली घातली.

‘‘पण तुला वाटलं तर तू फादर एनसैल्मशी बोलू शकतो. सायमनच्या डोळे लकाकू लागले.



फादर एनसैल्म बारीक होते, मोठ्या नाकवाले व्यक्ती होते. ते शिस्तीच्या नजरेने येत, पण ते खूप हुशार आणि बुद्धिमान होते.

काही दिवसानंतर ब्रदर विलियमने सायमनला सांगितलं की त्यांचे फादर एनसैल्मशी बोलणे झाले आहे. मठाधीशांना त्याला भेटायची इच्छा आहे. सायमन उत्तेजित झाला

जेव्हा ते दोघे फादर एनसैल्म यांच्या खोलीत गेले, फादर त्यांच्या खुर्चीत बसलेले होते. त्यांच्या हातामध्ये चर्मपत्राचे कितीतरी तुकडे होते, ज्यांच्याकडे ते बारीक नजरेने बघत होते.

''आहा सायमन,'' फादर यांनी त्याच्याकडे बघत म्हटले. “मी तुझी वाट बघत होतो. ब्रदर विलियम यांनी तुझ्या चित्रांचे काही नमुने मला दिले होते.


सायमनला हे बघून आश्चर्य वाटले की त्यांच्या हातात जे चर्मपत्र होते ते त्याने नुकतेच चित्रित केलेले होते.


''ब्रदर विलियम म्हणाले की तू एक उत्तम शिष्य आहे,” ते पुढे बोलत राहिले.

सायमनने अडखळत मान हलवली

''हे पण की तुला माझ्या एखाद्या पोथीसाठी चित्र काढायची इच्छा आहे.”

सायमनने परत हो म्हणत मान हलवली.







“तुझी चित्रे खूप चांगली आहेत.” फादर एनसैल्म पुढे म्हणाले. “तुझी नजर तिक्ष्ण आहे, आणि तू कोणत्याही वस्तूची नक्कल करू शकतो. पण फक्त कौशल्यच पुरेसे नसते सायमन. एक कलाकार होण्यासाठी कौशल्याबरोबर नजर देखील असावी लागते.

“नज़र?” सायमनने विचारले.

“बिलकुल, उमदा कलाकार तो नसतो जो चित्रांची हुबेहूब नक्कल करतो. उमदा कलाकार आपल्या कल्पनेने नवीन, सुंदर चित्रे रचतो.”

सायमनने आपल्याला समजलं आहे हे दाखवण्यासाठी मान हलवली.

“पोथीला हात लावण्यापूर्वी तुला आपले कौशल्य दाखवावे लागेल.”

“ते कसे?”

“उंदरावर नियंत्रण मिळवून!” फादर एनसैल्म यांनी ज़ोर देत म्हटले.

“त्यांना पकडून?”

“अरे हो! सद्ध्या मठात त्यांची संख्या खूप वाढली आहे.तुला जेवढे शक्य होतील तेवढे उंदीर पकड. पण एक गोष्ट तुला सांगून ठेवतो,” त्यांनी पुढे जोडले. “उंदीर चपळ असतात तुला त्यांचा अभ्यास करावा लागेल. त्यांना आतून आणि बाहेरून समजून घ्यावं लागेल. आणि लक्षात ठेव तुझ्या कल्पनेचा उपयोग सुद्धा करावा लागेल.





पुढचे काही आठवडे सायमन उंदरांना पकडण्याचा प्रयत्न करत होता. तो त्यांच्या मागे धावला, त्यांच्यावर उडी मारली. चर्मपत्राचे तुकडे त्यांच्या अंगावर फेकले. त्यांना पकडण्यासाठी पिंजरे लावले, जाळे पसरवले. पण हे काम त्याने जेवढा विचार केला त्यापेक्षा अधिक कठीण होते.



एक दिवस सायमन लेखन-कक्षात बसून चर्म-पत्रांच्या तुकड्यांवर पानाचे नमुने काढत होता. तितक्यात काही फुट लांब त्याला एक उंदीर दिसला. चर्मपत्राच्या खाली त्याने त्या जीवाला धरु लागला, पण चमकदार डोळ्यांचा तो उंदीर वाचला. सायमन फरशीवर तोंडावर पडला. तेवाच दरवाजा फटकन उघडला.



“फादर एनसैल्म!” डोळे वर करून बघताच सायमनच्या तोंडातून निघाले.

“सायमन?” फादर हे आश्चर्याने म्हणाले.

“खरंतर मि उंदीर पकडण्याचा प्रयत्न करत होतो,” सायमनने दम घेत सफाई दिली. “जसे तुम्ही सांगितले होते.”‘



“पण, मि तर तुला उंदीर पकडायला सांगितले नव्हते.”काही क्षण गप्प बसून फादर एनसैल्म म्हणाले.“ मी तुला त्यांच्यावर नियंत्रण ठेवायला सांगितले होते. दोन्हीमध्ये खूप फरक आहे.

एवढं म्हणून ते पुढे गेले.

''याचा अर्थ काय आहे?" सायमनने ब्रदर विलियम जेव्हा लेखन कक्षात भेटले तेव्हा समजून घेण्याची इच्छा त्याने दाखवली, "पण मी तुला उंदीर पकडायला सांगितले नव्हते. त्यांच्यावर नियंत्रण ठेवायला सांगितले होते? दोन्ही गोष्टी एक नाही का?

ब्रदर विलियम यांनी थोड्यावेळ विचार केला. ''असं वाटतं की फादर एनसैल्म यांनी तुला कोडं सोडवायला दिलं आहे. माझा सल्ला आहे की तू त्यांचा प्रत्येक शब्द गंभीरपणे घे. त्यांनी काय म्हटले होते ते सगळं लक्षात आहे ना?"

''हो! सायमनने उत्तर दिले. "उंदरांवर ताबा मिळवण्यासाठी मला जास्त अभ्यास करावा लागेल. त्यांना आतूनबाहेरून समजून घ्यावं लागेल आणि आपल्या कल्पनेचा उपयोग करावा लागेल."

''ओह,'' कोडं सुटल्यासारखे डोकं खाजवत उलझन ब्रदर विलियम यांनी म्हटलं. "सत्य हे एक कोडंच आहे."

त्या रात्री सायमनने आपल्या अंथरूणावर झोपत फादर एनसैल्म यांचे गूढ शब्दांशिवाय दुसरा काही विचार करू शकला नाही.ते शब्द त्याच्या डोक्यात घुमत होते. आणि अचानक त्याने दूर कोपऱ्यात थरथरणारा उंदीर बघितला.


सायमनने वळून त्याच्याकडे बघितले तेवढ्यात त्याला फादर यांचे शब्द आठवले. "तुला त्यांचा अभ्यास करावा लागेल,त्यांना आतून बाहेरून समजून घ्यावं लागेल."

सायमनने आपले डोळे त्या छोट्या जीवावर रोखले.तो त्याची प्रत्येक बारीक हालचाल बघू लागला.त्याला हे बघून आश्चर्य वाटले की उंदीर किती चौकस, किती सावध होता. छोट्याशा आवाजाने तो कशाप्रकारे पटकन हालचाल करतो. आणि मग कसा चपळतेने धावतो आणि गायब होतो.





सायमनने हे सगळे विचार डोक्यात ठेवले. मग तो झोपण्याच्या खोलीतून बाहेर पडला आणि हळूवार पावलांनी लेखन कक्षात गेला. चंद्राच्या चंदेरी प्रकाशात अस्वस्थ सायमनने चर्म पत्राचा एक तुकडा उचलला आणि जेवढे शक्य होती तेवढी चित्रे काढली. त्यानंतर तो झोपण्यासाठी गेला आणि गाढ झोपी गेला.



दुसऱ्या दिवशी सकाळी सायमनला ब्रदर विलियम बाहेर चौकात भेटले. ‘‘ब्रदर विलियम,’’ तो उत्साहात ओरडला, “मला समजले! मला उमजले.’’

‘‘काय समजले-उमजले?” ब्रदर विलियम यांना जाणून घ्यावं वाटलं.

‘‘फादर एनसैल्म यांचे कोडं उमजून घेतलं मी,” सायमनने उत्साहाने सांगितलं.

‘‘आणि ते काय होतं?”

‘‘त्यांना हे बघायचं होतं की मी उंदरांना किती चांगलं चित्रित करू शकतो. ताबा मिळवण्याचा हाच अर्थ होता त्यांचा.”

“मला ही चित्रे फादर एनसैल्म यांना दाखवायचे आहेत.” ब्रदर विलियम काही म्हणण्याच्या आधी सायमन वळला आणि वेगाने पळत उभा राहिला.

तो फादर एनसैल्म यांच्या खोलीकडे पळत होता. त्यांच्या घराकडे तो वळत असतांनाच तो फादर यांना धडकला.



“अरे लगाम लाव बाळा! मठाधीश कठोरपणे म्हणाले. “मठ पळण्याची जागा नाही.”

“माफ़ी करा फादर,” सायमन म्हणाला. “पण मि तुम्हांला भेटायला येत होतो. मी तुम्ही घातलेले कोडे सोडवले आहे.”

“ओह, असे काय?” फादर एनसैल्म म्हणाले. “आणि सांग तुला काय समजले ते?”

सायमनने कंबरेला लावलेल्या पेटीतून चर्मपत्र काढले आणि फादरच्या हातात ते चित्र ठेवले.

फादर एनसैल्म यांनी खूप वेळ त्या चित्रांकडे बघितले. “खूप सुंदर चित्रे काढली आहे तू,” ते शेवटी म्हणाले. “आपला विषयाचा नीट अभ्यास करण्याची आणि तो आतून बाहेरून समजून घेण्याची तुझ्यात क्षमता आहे. पण तरीही कोडे पूर्ण सुटलेले नाही.”

“ओह!” सायमन निराशने म्हणाला.

“बघ, कोड्याचे दोन भाग आहेत. पहिला भाग तर तू सोडवला. पण दुसरा भाग अजून बाकी आहे की तुझ्या कल्पनेचा वापर करतो तुझ्या हातात अजून आला नाही.” सायमनला ते चित्र परत करत फादर एनसैल्म यांनी म्हटले. आणि सायमनला विचारात बुडवून ते तिथून निघून गेले.




संध्याकाळच्या प्रार्थनेनंतर झोपण्याच्या खोलीत जाण्या एवजी सायमन गुपचूप लेखन कक्षात गेला म्हणजे त्याला, फादर एनसैल्मच्या म्हणण्यावर विचार करता येईल. उंबरा ओलांडून तो खोलीकडे निरखून बघू लागला. तिथे ब्रदर विलियम यांचे टेबल होते, शाईने भरलेल्या बाटल्याची रंग होती, दूरवर असणाऱ्या भिंतीला कितीतरी कपाटे लावलेली होती.

या कपाटात मठातील पोथ्या ठेवलेल्या होत्या. सायमन दिवसातून अनेक वेळा त्यांच्यासमोरून गेला होता. पण आता रात्री ती त्याला बोलवत होती. खरेतर फादर एनसैल्म यांच्या परवानगी शिवाय त्याने असे करायला नको होते, पण त्याने स्वतःला फरशीवर सगळ्यात मोठी पोथी पसरून तो त्याची पाने उलटत आहे, असे बघितले.

त्याने एकसारख्या पद्धतीने लिहलेली अक्षरे बघितली. त्याने चटकदार रंगांनी बघितलेली चित्रे बघितली. नजाकतीने काढलेल्या नक्षीने सजवलेली शीर्षके बघितली.

पण त्याची नजर शेवटी जिथे टिकून राहिली त्या होत्या जुन्या पोथ्या. त्यावर एवढी लाजवाब चित्रकारी होती की त्याने तशी कधी बघितली नव्हती.

त्याच्या लक्षात आलं की ब्रदर विलियम यांनी म्हटले होते की “एक पोथी तयार करणे किती त्रासाचे, सावकाश करण्याचे काम असते. प्रत्येक शब्दाला लक्षपूर्व, सावधानतेने लिहले जात असे. प्रत्येक चित्र काढण्यापूर्वी त्याची एक योजना तयार केली जाई. पूर्ण काम खूप थकवणारे असे, तरीही विनोदाच्या शिवाय होत नसे.”



हे लक्षात घेऊन सायमनने पोथीवर काढलेली चित्रे बारकाईने बघितली.

कसे हास्य-विनोद लपले होते त्या पोथ्यामध्ये! कशाप्रकारे खिलाडूपणा आणि कशा कल्पना!

अचानक सायमन थांबला. फादर एनसैल्म यांना हेच तर म्हणायचे नव्हते ना? जेव्हा त्यांनी म्हटले होते की मोठे कलाकार ते नसतात जे चित्रांची हुबेहूब नक्कल करतात. तर ते आपल्या कल्पनेने अद्भुत चित्रे काढतात.



सायमन हा विचार करत होता तेव्हा त्याची नजर फादर एनसैल्म यांच्या टेबलाच्या खाली असणाऱ्या उंदरावर पडली, ज्याच्या मिशा उडत होत्या.

उंदीर पळून जात नाही तोपर्यंत सायमन कोणतीही हरकत न घेता भूत बनून त्या उंदराकडे बघत राहिला,



त्यानंतर सायमनने चर्म-पत्र घेतले आणि त्यावर दणादण उंदीर काढू लागला. त्याने काही क्षणापूर्वी उंदीर पहिला होता तसे नाही, तर त्याने आपल्या कल्पनेने त्याला कसे पाहिले तशी चित्रे त्याने काढली.




सायमन चित्रा वर चित्र काढत गेला, जोपर्यंत ते चर्मपत्र पूर्ण भरून जात नाही. दुसऱ्या दिवशी परत तो फादर एनसैल्मच्या शोधात निघाला. यावेळी तो धावला नाही, खूप सावकाश चालला. लेखनकक्षाच्या बाहेरच फादर ब्रदर विलियमशी बोलतांना दिसले.

सायमन तोंडाने काहीच बोलला नाही. आपल्या पेटीतून त्याने चर्मपत्र काढले, उघडले आणि मठाधीशांच्या हाती सोपवले.

ते सायमनच्या चित्रांनी भरलेले होते.

फादर एनसैल्म लक्षपूर्वक बघत होते. त्यांच्या ओठावर एक पटल्याचे हसू होते. ‘‘शाबास बेटा’ ते म्हणाले, “खूप छान! आता तुला माझी पूर्ण म्हणणे समजले आहे.”



त्यांनी एका हाताने लेखन कक्षाचा दरवाजा उघडला आणि दुसऱ्या हाताने सायमनला इशारा करत आत बोलावले.

“ये, माझ्या बाळा आता तुझ्यातली कल्पना जागी झाली आहे. तू आपल्या कौशल्याचा उपयोग लेखन कक्षात करू शकतो. इथे केवळ चर्मपत्रच तुला करायचे नाही, लेखणी आहे जी सोलून तुला तयार करायची आहे, रंग आहेत जे कुटायचे आहेत, एवढेच नाही तर सर्व चित्रे आहेत जी तुला काढायची आहेत, फक्त उंदीरच नाही, पाली, माशा, फुले, झाडी, रोपे, किडे आणि माणूस, प्रत्येक प्रकारचा जीव. कारण पोथीच्या पानांत अजब प्रकारचा एक संसार आहे, तो बघण्याची इच्छा असणारे तो बघू शकतात.





“आणि सायमन ते जग प्रकाशित करण्यासाठी तू आता मदत करशील.”

उपसंहार

मध्ययुग रोमन साम्राज्य पतनापासून पुनर्जागरण काळापर्यंत, एक हज़ार वर्षांचे मानले जाते. या काळात हातांनी तयार केलेली पुस्तके ज्यांन 'इल्यूमिनेटेड मैन्युस्क्रिप्टस्' म्हटले जाई, इतिहास लिहून ठेवण्यासाठी, सुरक्षित ठेवण्यासाठी सगळ्यात महत्वाचा मार्ग होता.

सायमन याच काळातला होता, अकराव्या शतकाच्या मध्यातला. त्या काळात धार्मिक पोथ्या मठातले संन्यासी तयार करत. चर्च कहाण्या सांगत आणि इतिहास लिहून ठेवत म्हणून त्यांची गरज होती. त्याचबरोबर चर्च धार्मिक श्रद्धांचा प्रसार करण्यासाठी मदत करत असे.

याच कारणामुळे त्या खूप लक्षपूर्वक तयार केल्या जात असत. त्या तयार करतांना काही नियमांचे काटेकोरपणे पालन केले जी. खास करून जेव्हा चित्र काढली जात. कारण चित्र फक्त सजावटीसाठी नसत तर ते प्रतीकात्म असत, म्हणजे प्रत्यक चित्र एक कहाणी सांगत. येशूच्या जीवनाची, संतांच्या जीवनाची, चर्चच्या इतिहासात घडलेल्या घटनेची. त्याकाळी सामान्य जनता वाचू-लिहू शकत नसे.म्हणून चित्रातूनच त्यांच्या पर्यंत संदेश पोहचत असे.

अशा प्रकारे विचार पोहचवण्यासाठी काही प्रशिक्षित सन्यासी पानांची सजावट करत असत. त्यांना 'इल्यूमिनेटर' म्हणजे चित्रकार म्हटले जाई. हे चित्रकार काही नियमांचे, रुढींचे कठोर पालन करत असत.त्यात काही कौशल्यांचा समावेश असे, जसे की संताच्या हाताची मुद्रा, त्यांच्या हातातल्या वस्तू, त्यांच्या कपड्यांचा रंग. याची हुबेहूब नक्कल केली जात असे. तशाच प्रकारे पोथीतल्या लिखित भागातील अक्षरांची सावधानपूर्वक नक्कल करून दुसऱ्या पोथीत लिहले जाई. साहजिकच अशा प्रकारे पथी लिहायला खूप वेळ लागत असे.

पण इल्यूमिनेटर कलाकार होते आणि कलाकारांना आपल्या कलेसाठी स्वातंत्र्य हवे असते. मग तो कलाकार आपली अभिव्यक्ती कुठे व्यक्त करेल? कारण पोथीत लिखित भाग आधीच मौजूद असे, जो हुबेहूब उतरवला जाई. आणि मुख्य चित्र कठोर नियमांच्या नुसार केले जाई, मग तो इल्यूमिनेटर आपली कल्पना कुठे आणि कशी वापरणार?

आपल्या कल्पना मुक्तपणे वापरण्यासाठी काही ठिकाणे होती. दोन ओळींच्या मध्ये किंवा लिखित भाग ज्याठिकाणी कमी असेल तिथे खाली चित्रकार मोहक नमुने तयार करत. पानांच्या मध्यभागी नक्षी काढत.

या इल्यूमिनेटर मध्ये चित्रकार आपल्या कल्पनाशीलतेला पूर्ण मुभा देत असे. इथे त्याची रचनात्मकता वाहत असे. पोथीमध्ये सायमनल फादर एनसैल्मच्या कोड्याचे उत्तर मिळाले होते.